महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ १३ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३१४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

प्रतिनिधी हवे आहेत

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी प्रतिनिधी नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com




थोडक्यात महत्वाचे

## पालिकेने सील केलेल्या मसाला गिरण्या जोमात सुरु

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: मुख्य बाजारपेठ येथिल महापालिकेच्या प्रदूषण विभागाने मोठा गाजावाजा करून बंद केलेल्या ध्वनी प्रदूषण करणाऱ्या मसाला गिरणी पुन्हा सुरु झाल्याने या भागातील नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कोणाच्या दबावाला महापालिका बळी पडली, असा संतप्त सवाल परिसरात विचारला जात आहे. मागील आठवड्यात ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या आदेशानुसार मुख्य बाजारपेठ परिसरातील ध्वनी प्रदूषण करणाऱ्या सहा मसाला गिरण्यांना सील लावून त्या बंद करण्यात आल्या होत्या. या भागातील नागरिकांना आणि व्यापाऱ्यांना ध्वनी प्रदूषणाचा तसेच वायू प्रदूषणाचा प्रचंड त्रास होत असल्याने या भागातील व्यापारी आणि नागरिकांनी त्याची तक्रार आमदार संजय केळकर यांच्याकडे केली होती. त्यांनीही प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली असता कानाला त्रास होत असल्याचे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी महापालिका आयुक्त श्री. राव यांच्या निदर्शनास नागरिकांना होणारा त्रास आणून दिला होता. त्याची दखल घेऊन आयुक्त श्री. राव यांनी दिलेल्या आदेशानुसार या सहा मसाला गिरण्यांना सील लावण्यात आले होते. त्यामुळे काही जणांनी तक्रारदार नागरिक आणि व्यापाऱ्यांना धमकी दिली होती. या गिरण्या बंद राहतील अशी या भागातील नागरिकांची अपेक्षा होती, परंतु पुन्हा एकदा या गिरण्या सुरु झाल्याने या भागातील नागरिकांमध्ये उलट सुलट चर्चा सुरु झाली आहे. ध्वनी प्रदूषण करणाऱ्या या मसाला गिरण्या कायमस्वरूपी बंद कराव्यात, अशी मागणी आयुक्त श्री. राव यांच्याकडे करण्यात येणार आहे.

## कल्याण , भिवंडी तालुक्यात आज सरपंचपदाची आरक्षण सोडत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राजेश दळवी

पडघा दि. १२ (प्रतिनिधी) राजकीय दृष्ट्या महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या भिवंडी तालुक्यातील विविध ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाची प्रवर्ग निहाय आरक्षण सोडत आज जाहीर होणार आहे. तालुक्यातील महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या १२१ ग्रामपंचायतीच्या सन २०२५ ते ३० या कालावधीच्या प्रवर्ग निहाय सरपंच आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जिल्हाधिकारी ठाणे यांच्या आदेशाने १३ मे २०२५ रोजी भिंवडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या वऱ्हाळदेवी येथील माता मंगल भवन कामतघर येथे सकाळी ११ वाजता तहसीलदार भिवंडी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येणार असल्याने सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी नागरीक यांनी सोडत कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तर तालुक्यातील विविध ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण काय निघते याकडे तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, नागरीक, यांचे लक्ष लागले आहे.

## शहापूर तालुक्यात भीषण पाणीटंचाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ता. १२ : मुंबईसह ठाणे जिल्ह्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांचा असलेला तालुका सध्या भीषण पाणीटंचाईला सामोरा जात आहे. ३९ गावे आणि १३७ पाड्यांमध्ये तीव्र पाणीटंचाई असून ४८ टँकरमधून पाणी पुरवले जात आहे; पण लोकसंख्येच्या तुलनेत पुरवठा अपुरा असल्याने 'धरण उशाला... कोरड घशाला...' अशी अवस्था शहापूर, मुरबाड तालुक्याची झाली आहे. ठाणे जिल्ह्यात वस्ती असलेल्या गावांची संख्या ८०७ आहे. तर एक हजार ९७५ पाडे आहेत. यातील २८४ गावे आणि ५१४ गावांना दरवर्षी तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. यामध्ये शहापूर तालुक्यातील टंचाईग्रस्त गावपाड्यांची संख्या सर्वाधिक आहे. काही वर्षांमध्ये जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विंधन विहीर, हातपंप यासह जलजीवन मिशनअंतर्गत प्रत्यक्ष 'हर घर नल से जल' योजनेतून घराघरांत पाणीपुरवठा करण्याचा दावा जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून करण्यात येत आहे; मात्र ही योजना अपूर्ण असल्याने गाव-पाडे टँकरवर अवलंबून आहेत.

# भिवंडीत आगडोंब

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी:** मुंबई नाशिक महामार्गावरील भिवंडी तालुक्यातील वडपे येथील रिचलँड कॉम्प्लेक्समधील भल्या मोठ्या गोदामास सोमवारी पहाटेच्या सुमारास भीषण आग लागण्याची घटना घडली आहे. या गोदाम संकुलात एकूण २२ गोदाम आगीच्या भक्षस्थानी पडले असून या गोदामात कपडे, बूट, केमिकल, इलेक्ट्रॉनिकस साहित्य मोठ्या प्रमाणावर साठवलेले होते. यामुळे या गोदामांमध्ये साठवलेला कोट्यावधी रुपयांचा माल जळून खाक झाला आहे. आगीची माहिती मिळताच भिवंडीसह कल्याण येथील प्रत्येकी दोन अशा चार



## २२ गोदामे जाळून खाक

अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल होत आगीवर नियंत्रण मिळविण्याचे कसोशीने प्रयन्न सुरू केले. परंतु पाण्याची कमतरता असल्याने आग विझवण्यास अडचण येत होती. केमिकल गोदामातील आग विझवण्यासाठी फोम चा वापर करण्यात येत आहे.आगीचे कारण अजून अस्पष्ट असून, मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असले तरी सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. या आगीत के. के. इंडिया पेट्रोलियम स्पेसियालिटीज प्रा.ली., कॅनन इंडिया प्रा.ली.कंपनी, ब्राईट लाईफकेअर प्रा.लि.कंपनी, होलीसोल प्रा.ली. कंपनी, एबॉट हेल्थकेअर प्रा.ली कंपनी, डेकोरेशन साहित्याचे मोठे गोदाम आहेत. या गोदामात मोठ्या प्रमाणात केमिकल, प्रिंटिंग मशीन, इलेक्ट्रॉनिक साहित्य,आरोग्य संबंधित प्रोटीन खाद्यपदार्थ पावडर, कॉस्मेटिक साहित्य, कपडे, बूट, मंडप डेकोरेशन साहित्य व फर्निचर साठवण्यात आले होते.अग्निशमन दलाच्या अथक प्रयत्नानंतर आठ तासांनी ही आग आटोक्यात आली असल्याचे अग्निशमन दलाकडून सांगण्यात आले आहे.

## माता भगिनींचे कुंकू पुसण्याचा परिणाम काय होतो? हे पाकला दाखवून दिलं - पंतप्रधान मोदी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नियोजित वेळेनुसार आज रात्री 8 वाजता देशवासीयांशी संवाद साधला. त्यामध्ये, भारत पाकिस्तान युद्धजन्य परिस्थिती आणि ऑपरेशन सिंदूरवर भाष्य करताना भारतीय सैन्य दलाच्या शौर्याला सलाम केला. गेल्या काही दिवसांत भारतीय सैन्य दलाने दाखवेल्या शौर्याचा मला अभिमान आहे. मी भारतीय सैन्य दलास, त्यांच्या शौर्याला आणि प्रत्येक भारतीयांना सॅल्यूट करतो. देशातील प्रत्येक आई, मुलगी आणि लाडक्या बहिणीला मी सलाम करतो. 22 एप्रिल रोजी पहलगाम येथे दहशतवाद्यांनी निष्पाप भारतीयांना धर्म विचारुन ठार मारले. दहशवाद्याचा हा विभत्स चेहरा आहे. दहशतवाद्यांना मातीत गाडण्यासाठी आपण भारतीय सैन्य दलास संपूर्ण मोकळीक दिली होती. आमच्या आया-बहिणीचं कुंकूं पुसण्याचा परिणाम काय होतो, हे आम्ही दाखवून दिलं, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ऑपरेशन सिंदूरचं वर्णन केलं.



# समर्पित भावनेने सेवा करणार नसाल; तर घरचा रस्ता

## केडीएमसी आयुक्तांचे आरोग्य विभागाला खडे बोल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



कोणतंही कारण न देता महिन्याभरात कारभार सुधारा; अन्यथा कारवाई - आरोग्य अधिकाऱ्यांना कडक शब्दांत इशारा

**कल्याण** - कल्याण डोंबिवली पालिका रुग्णालये, आरोग्य सेवा केंद्र आणि तेथे चालणाऱ्या कामांविषयी वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणून आपल्याकडे कसलीही माहिती नाही. वैद्यकीय प्रशासनावर आपले नियंत्रण नाही. आपण पालिका रुग्णालये, आरोग्य केंद्रांमध्ये कधी भेटी दिल्या नाहीत. त्यामुळे वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणून आपले हे अपयश आहे, अशा खरमरीत शब्दात आयुक्त अभिनव गोयल यांनी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांना सुनावले. आणि पालिका रुग्णालयातील प्रत्येक डॉक्टरने अतिशय समर्पित भावने रुग्णसेवा करावी. ते जमत नसेल तर त्यांना घरचा रस्ता दाखविला जाईल, असा इशारा आयुक्तांनी डॉक्टरांना दिला. कोणीही तुमच्या दारात पालिकेत रुग्णसेवा देण्यासाठी या म्हणून सांगण्यास आले नव्हते. तुम्ही स्वताहून पालिकेत आला आहात. त्यामुळे जबाबदारीचे भान ठेऊन आहे त्या परिस्थितीत योग्यरितीने प्रत्येक डॉक्टरने रुग्णसेवा द्यावी. ते जमत नसेल तर सरळ बाहेरचा रस्ता दाखविला जाईल, अशी तंबी आयुक्तांनी पालिका रुग्णालयातील डॉक्टरांना दिली. रुक्मिणीबाई रुग्णालयात रुग्णवाहिका अभावी सविता बिराजदार (४३) या महिलेचा मृत्यू झाल्याने आयुक्तांनी पालिका रुग्णालयांचा विषय गांभीर्याने घेतला आहे.

शनिवारी सुट्टीचा दिवस असुनही आयुक्त गोयल यांनी पालिका रुग्णालयातील डॉक्टर, इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांची एकत्रित चार तास बैठक घेतली. या बैठकीत आयुक्तांनी वैद्यकीय आरोग्य अधिकारी दीपा शुक्ला यांना केलेल्या वैद्यकीय सेवेबद्दलच्या प्रश्नावर त्या समाधानकारक उत्तरे देऊ न शकल्याने, आयुक्तांनी तीव्र नाराजी व्यक्त करत त्यांना कामातील सुधारणेबद्दल सुनावले. रुग्णालयात किती महिला येत्या महिन्यात प्रसुत होणार आहेत. याविषयीची माहिती डॉ. सुहासिनी बढेकर देऊ शकल्या नाहीत. याबद्दलही आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली. बाह्य स्त्रोत संस्थेचे डॉक्टर वेळेत उपलब्ध होत नसतील आणि नुसती देयके काढण्यासाठी हे डॉक्टर पालिकेत रुग्ण सेवा देणार असतील तर त्यांच्या पालिकेतील सेवा बंद करा, असे आयुक्तांनी सुचविले.

## आज दहावीचा निकाल

कुठे पाहाल निकाल?
https://results.digilocker.gov.in
https://sscresult.mahahsscboard.in
https://sscresult.mkcl.org
https://results.targetpublications.org

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी परिक्षेचा निकाल उद्या म्हणजेच मंगळवारी जाहीर होणार आहे. ठाणे जिल्ह्यातून १ लाख २१ हजार २४४ विद्यार्थ्यांनी दहावीची परिक्षा दिली होती. ३३८ परिक्षा केंद्रावर ही परिक्षा पार पडली होती. ही परिक्षा कॉपीमुक्त व्हावी यासाठी जिल्हास्तरावर भरारी पथक तैनात करण्यात आले होते. आता, उद्या जिल्ह्यातील किती विद्यार्थी या परिक्षेत उत्तीर्ण होणार आहेत, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गेल्या वर्षी म्हणजेच सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात ठाणे जिल्ह्यात दहावीचा निकाल ९५.५६ टक्के लागला होता. यात, मुलींनी बाजी मारली होती. त्यामुळे २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात जिल्ह्यात दहावीचा किती टक्के निकाल लागणार, तसेच किती विद्यार्थी उत्तीर्ण होणार आणि यंदाही मुली बाजी मारणार की, मुले याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात दहावीच्या परिक्षेसाठी ठाणे जिल्ह्यातून १ लाख २१ हजार २४४ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. परिक्षा व्यवस्थित पार पडावी यासाठी शिक्षण विभागाच्या अंतर्गत भरारी पथक आणि आवश्यकतेप्रमाणे बैठे पथकाची नियुक्ती करण्यात आली होती. या भरारी पथकामध्ये माध्यमिक शिक्षणाधिकारी, प्राथमिक शिक्षणाधिकारी, निरंतर शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, उपशिक्षणाधिकारी, तज्ज्ञ शिक्षक, प्राध्यापक आणि मुख्याध्यापक यांच्या पथकाचा समावेश होता. तसेच महिला विशेष पथकाचा देखील समावेश असल्याचे पाहायला मिळाले होते.

## भूसंपादनाची अधिसूचना रद्द

## काळू धरणाचे काम रखडणार?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** वाढत्या ठाणे जिल्ह्याची तहाण भागवण्यासाठी प्रस्तावित असलेल्या काळू धरणाच्या उभारणीचे काम पुन्हा एकदा रखडण्याची चिन्हे आहेत. घाईघाईने लोकसभा निवडणुकीपूर्वी काढण्यात आलेली काळू धरणाच्या भूसंपादन अधिसूचना रद्द झाली आहे. प्राथमिक अधिसूचनेनंतर अंतिम अधिसूचना वर्षभरात येणे अपेक्षित होते. मात्र ग्रामस्थांचा विरोध, वैयक्तिक हरकती, याविरूद्ध प्रशासकीय स्तरावर केलेला पत्रव्यवहार यामुळे प्रक्रिया रखडली. परिणामी वर्षभभरात अंतिम अधिसूचना येऊ न शकल्याने प्राथमिक अधिसूचना कालबाह्य ठरली आहे. त्यामुळे आता नव्याने प्राथमिक अधिसूचना काढावी लागणार आहे.

काळू धरणाच्या उभारणीसाठी १४ मार्च २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीची घोषणा होण्यापूर्वी घाईघाईत भूसंपादनासाठीची



प्राथमिक अधिसूचना काढण्यात आली होती. मात्र या पूर्वीप्रमाणेच स्थानिक ग्रामस्थ, ग्रामपंचायती आणि श्रमिक मुक्ती संघटनेने या अधिसूचनेला विरोध केला होता. त्यानंतर सूचना आणि हरकती प्रक्रियेत या अधिसूचनेला सुमारे २०० वैयक्तिक हरकती सादर करण्यात आल्या होत्या. अनेक ग्रामसभांनी या अधिसूचनेला हरकती घेतल्या होत्या. तसेच त्यासाठी सुरू केलेल्या संयुक्त मोजण्यांनाही अनेक ग्रामस्थांनी कडवा विरोध केला होता. वेळेप्रसंगी या मोजणी प्रक्रिया बंद पाडल्या होत्या.

अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभा आणि आदिवासी - जंगलवासिंच्या संविधानाने मान्य केलेल्या हक्काना डावलून अनधिकाराने ही अधिसूचना काढल्यामुळे ती रद्द करावी अशी मागणी करणारी पत्रे मुख्यमंत्री, आदिवासी विकास विभागाच्या सचिवांना पाठवण्यात आली होती. त्यानंतर या प्रक्रियेबाबत संबंधित विभागाकडून खुलासाही मागवण्यात आला होता.

ठाणे पालिका आयुक्तानी दिला याचिकाकर्त्याला एक लाखांचा धनादेवा, उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर दिला धनादेश

आंदोलने, पत्र व्यवहार, निषेध आणि विरोध अशा विविध माध्यमातून या भूसंपादन प्रक्रियेला अडथळा निर्माण झाला. त्यामुळे अखेर गेल्या महिन्यात भूसंपादनासाठीची प्राथमिक अधिसूचना व्यपगत अर्थात कालबाह्य झाली. स्थानिक ग्रामस्थांनी सादर केलेल्या हरकतींना उत्तर देताना कल्याण उपविभागीय अधिकारी आणि भूसंपादन अधिकाऱ्यांनी याबाबतचे लेखी पत्र दिले आहे. त्यामुळे या भूसंपादनाची अंतिम अधिसूचना जाहीर होऊ शकली नाही. त्यामुळे ही अधिसूचना रद्द झाली आहे. आता प्रशासनाला पुन्हा एकचा प्राथमिक अधिसूचना काढावी लागणार आहे. त्यामुळे पुन्हा संपूर्ण प्रक्रिया नव्याने करावी लागेल.




## आमदार किसन कथोरेंच्या हस्ते बागेश्वरी तलावाच्या सुशोभीकरणाचे भूमिपूजन!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दिलिप पवार

मुरबाड शहराच्या व तालुक्याच्या विकासासाठी नेहमीच महत्वकांक्षी प्रकल्प आणणारे आमदार किसन कथोरे यांनी शहराला पाणीपुरवठा करणार्या बागेश्वरी तलावाचे दुसर्यांदा सुशोभीकरण होत आहे. महाराष्ट्र शासनाच्या राज्य सरोवर संवर्धन योजनेतून हे काम होणार असून 4 कोटी 99 लाख रुपये खर्च होणार आहे.या विविध विकास कामांचे भूमिपूजन आज आमदार किसन कथोरेंच्या हस्ते बागेश्वरी तलाव येथे करण्यात आले.

या सुशोभीकरणामधे प्रामुख्याने



गाळ काढणे, जबियन भिंत,स्टोन पिचिंग,झाडे लावणे,बॅन्ड स्ट्रेंगथिंग, पथ वे,बेंचेस, सोलर स्ट्रीट लाईट, वाचमन केबिन व इतर कामे या योजनेतून होणार आहेत. यावेळी आमदार कथोरे यांनी या तलावासाठी हवा तेवढा निधी उपलब्ध करून देणार असून तिसर्या टप्प्यात धरणाचा बांध सिमेंट कांक्रेटचा करणार असून भविष्यातील मुरबाड करांचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी तलावाचे विस्तारीकरण व गाळ काढण्याचे काम करणार असल्याचे यावेळी सांगितले तर या सुशोभीकरणा मुळे एक चांगले पिकनिक स्थळ या ठिकाणी तयार होणार असल्याचे म्हटले आहे.

या भुमिपूजनासाठी राजेश पाटील, नितीन मोहपे, अनिल घरत, भाई तेलवणे, दिपक पवार,जितेंद्र भावार्थे,सुरेश बांगर,मोहन सासे,मुकेश विशे, किसन कथोरे, रविंद्र देसले, दिनेश उघडे, सुरेश साबळे,नरेश मोरे,जगन्नाथ माळी, मधुरा सासे, मानसी देसले,सौ.चव्हाण,मनोज देसले, अतुल देशमुख, सागर कार्ले , नगरपंचायतचे अभियंता परेश पवार, दत्तात्रय डोहळे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.



# गीतासार



## अध्याय १०
## विभूतियोगः

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम् ॥ १०-४१ ॥

जी जी ऐश्वर्ययुक्त, कांतियुक्त आणि शक्तियुक्त वस्तू आहे, ती ती तू माझ्या तेजाच्या अंशाचीच अभिव्यक्ती समज. ॥ १०-४१ ॥

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन । विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥ १०-४२ ॥

किंवा हे अर्जुना, हे फार फार जाणण्याचे तुला काय प्रयोजन आहे? मी या संपूर्ण जगाला आपल्या योगशक्तीच्या केवळ एका अंशाने धारण करून राहिलो आहे. ॥ १०-४२ ॥

ॐ तत्सदिति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे विभूतियोगो नाम दशमोऽध्यायः ॥ १० ॥

ॐ हे परमसत्य आहे. याप्रमाणे श्रीमद्भगवद्गीतारूपी उपनिषद तथा ब्रह्मविद्या आणि योगशास्त्राविषयी श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादातील विभूतियोगः नावाचा हा दहावा अध्याय समाप्त झाला. ॥ १० ॥

# महाराष्ट्र उद्योजक परिवाराची बैठक संपन्न

● दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण(कुणाल म्हात्रे) : महाराष्ट्र उद्योजक परिवाराची बैठक डोंबिवली शहरात जोंधळे कॉलेज या ठिकाणी संपन्न झाली. महिलांच्या हस्ते प्रतिमापूजन संपन्न झाले. नंतर पहेलगाम येथील मृत्युमुखी पर्यटक व देशासाठी सिंदूर मिशन मध्ये शहीद झालेल्या सैनिकांसाठी श्रद्धांजली अर्पण केली.

कार्यक्रमाची प्रस्तावना महाराष्ट्र उद्योजक परिवार चे संस्थापक अध्यक्ष मंगेश शेळके यांनी मांडली. उद्योजक परिवार का स्थापन झाला आणि कसे काम चालते यावर विस्तृत माहिती मंगेश शेळके यांनी दिली.



तसेच आलेल्या सर्व उद्योजकांचे उद्योजक परिचय झाला. डोंबिवली आणि डोंबिवली संलग्न भागांमधून अनेक उद्योजक आले होते. आणि महाराष्ट्र उद्योजक परिवाराच्या मीटिंग ला सक्रीय सहभाग घेतला. खरेदी विक्री लाखो रुपयांची उलाढाल झाली. विशेष पाहुणे म्हणून रुपेश तळेले ( महाराष्ट्र राज्य गुगल ट्रेनर ) होते. त्यांनी सायबर अटॅक्ट अणि आर्थिक फ्रॉड कसे रोखता येऊ शकतात या विषयावर ट्रेनिंग दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एमयुपी संचालक प्रशांत पवार यांनी केले व महिला वर्गाला मातृदिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे आयोजन संतोष बाणखेले. भूषण अवसरे. गोरख बोरकर तसेच एमयुपी डोंबिवली संपर्कप्रमुख आणि संचालक नितीन भराट यांनी केले. कार्यक्रमाला प्रशासक माधुरी फलक सुद्धा उपस्थित होत्या. तसेच जयश्री लोमटे, अक्षता औटी, एमयुपी नवी मुंबई प्रशासक विजया निमसे उपस्थित होत्या. आभार प्रदर्शन संचालक सामाजिक क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्तिमत्व अवि सुक्रे यांनी केले.

# सावित्रीच्या लेकींचे प्रेरणादायी यश !



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. राज्याचा बारावीचा निकाल ९१.८८ टक्के लागला. नेहमीप्रमाणे कोकण विभागाने या निकालात बाजी मारली. कोकण विभागाचा ९६ .७४ टक्के निकाल लागला असून कोकण विभागाने राज्यात अव्वल स्थान पटकावले असून लातूर विभाग निकालात तळाशी राहिला आहे. लातूर विभागाचा निकाल ८९.४६ टक्के इतका लागला आहे. लातूर विभाग टक्केवारीत सर्वांचा मागे पडला हे या निकालातून स्पष्ट दिसते. मागील दशकात लातूर विभाग हा दहावी बारावीच्या निकालात सातत्याने अग्रस्थानी राहिला आहे. लातूर पॅटर्न हा दहावी बारावीच्या निकालासाठी राज्यात प्रसिद्ध होता. आताही नीट आणि जेईई परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांची पसंती लातूरलाच असते. नीट आणि जेईईची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांची पहिली पसंती पुणे आणि दुसरी पसंती लातूर असते. ज्यांना शक्य आहे ते पालक आपल्या पाल्यांना राजस्थानातील कोटा येथेही पाठवतात मात्र महाराष्ट्रात लातूर पॅटर्नने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली असताना लातूरची निकालात इतकी घसरण होणे हे आश्चर्यकारकच आहे. अर्थात निकालात घसरण फक्त लातूर विभागाची झाली असे नाही तर संपूर्ण राज्याचा निकाल यावर्षी घसरला आहे. यावर्षी राज्याचा निकाल ९१. ८८ टक्के लगला जो मागील वर्षीच्या तुलनेत १.४९ टक्क्यांनी कमी आहे. मागील वर्षी म्हणजे २०२४ साली बारावीचा निकाल ९३.३७ टक्के होता. यावर्षी बारावीचा निकाल का घसरला ? असा प्रश्न विचारला जात आहे. यावर्षी राज्य सरकारने कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले त्यामुळे हा निकाल घसरला असण्याची शक्यता आहे. अर्थात हे चांगलेच झाले. कॉपीमुक्त परीक्षा या अभियानामुळे राज्याची खरी गुणवत्ता समोर आली. मध्यंतरी राज्याचा निकाल हा ९७ ते ९९ टक्यांच्या दरम्यान असायचा आणि त्यात शेकडो विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळायचे. सरकारने कॉपीमुक्त परीक्षा हे अभियान राबवल्या मुळे कॉपिला काही प्रमाणात आळा बसला आहे. सरकारने हे अभियान यापुढेही चालू ठेवावे. विद्यार्थ्यांनी कॉपिवर अवलंबून न राहता वर्षभर नियमितपणे अभ्यास करावा कारण काळ झपाट्याने बदलत आहे. आता शिक्षणातही तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. आज

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

उत्तरपत्रिका शिक्षक तपासित आहेत पण भविष्यात या परीक्षांच्या उत्तरपत्रिका ए आय च्या मदतीने तपासल्या जातील. जेंव्हा ए आय तंत्रज्ञान वापरून उत्तरपत्रिका तपासल्या जातील तेंव्हा निकाल आणखी घसरण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे तंत्रस्नेही शिक्षक दिसले गुरुजींनी यावर्षी त्यांच्या वर्गाच्या उत्तरपत्रिका ए आय तंत्रज्ञान वापरून तपासल्या. ए आय तंत्रज्ञानाने अवघ्या काही सेकंदात एक उत्तर पत्रिका तपासून होते हे त्यांनी दाखवून दिले त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात उत्तर पत्रिका तपासण्याकरिता होणार हे नक्की त्यामुळे यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही. अर्थात राज्याचा एकूण निकाल घसरला असला तरी या निकालात मुलींनी नेहमीप्रमाणे बाजी मारली आहे. यावर्षी जवळपास ९४.५८ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जवळपास ५ टक्क्यांनी अधिक आहे. मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८९.५१ टक्के इतके आहे. अर्थात दहावी असो की बारावी निकालात कायम मुलीच बाजी मारत असतात हे आपण यावर्षीच नाही तर मागील अनेक वर्षापासून पाहत आहोत. निकालात मुलींनी बाजी मारणे ही नक्कीच अभिमानास्पद बाब आहे. परीक्षार्थी मुलींची संख्या कमी असूनही उत्तीर्ण होणाऱ्या मुलींचे प्रमाण जास्त असणे हे मोठ्या शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे लक्षण आहे. सावित्रीच्या लेकिंची ही गरुड भरारी पाहून संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे. एकेकाळी केवळ चूल आणि मूल इतकेच ज्यांचे जग होते त्या मुली आज गगनभरारी मारत आहेत. सावित्रीच्या लेकींचे हे यश निश्चितच प्रेरणादायी आहे. एकेकाळी ज्या मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते त्याच मुली आज शिक्षण व्यवस्थेचे सर्वात मोठे संचित बनू पाहत आहे. पुरोगामी महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. कठोर परिश्रमाने मुलींनी हे यश मिळवले आणि इतरांना प्रेरणा दिली. कठोर परिश्रमातून मुलींनी हे यश मिळवून समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे. बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन आणि सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस मनापासून शुभेच्छा!

# उल्हासनगर येथे निरंकारी भक्तांचे रक्तदान

● दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांची शिकवणूक जीवनात उतरवत मानवीयतेचा आदर्श समोर ठेवत संत निरंकारी सत्संग भवन, गोल मैदान, उल्हासनगर येथे रविवारी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात 94 निरंकारी भक्तांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. संत निरंकारी रक्तपेढी, विलेपार्ले, मुंबई मार्फत या शिबिरामध्ये रक्त संकलन करण्यात आले.

संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल



फाउंडेशनच्या माध्यमातून आयोजित केलेल्या या रक्तदान शिबिरामध्ये संत निरंकारी मिशनच्या उल्हासनगर तसेच आजुबाजूच्या शाखांमधील 117 भाविक भक्तगणांनी रक्तदानासाठी आपली नाव नोंदणी केली होती. यावरुन त्यांच्या मानवसेवेच्या उदात्त भावनेची प्रचिती येते.मिशनचे स्थानिक सेक्टर संयोजक आणि सेवादल अधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये निरंकार ईश्वराच्या प्रति प्रार्थना करत सतगुरुंच्या जयघोषा द्वारे या शिबिराचा शुभारंभ करण्यात आला.

हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी स्थानिक सेक्टर संयोजक किशन नेनवाणी आणि क्षेत्रीय संचालक जनार्दन म्हात्रे यांच्या देखरेखीखाली सेवादल स्वयंसेवक व संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी महत्वपूर्ण योगदान दिले.

# राष्ट्रीय लोकअदालतीत रायगड जिल्ह्यात ४३६१ प्रकरणे निकाली

● दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण(धनाजी घरत) : दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणांचा जलद व सामोपचाराने निपटारा करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीत रायगड जिल्ह्यातील एकूण ४ हजार ३६१ प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. यामध्ये एकूण १९ कोटी १७ लाख ७८ हजार ५० रुपयांची तडजोड रक्कम पक्षकारांना मिळवून देण्यात आली, अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल शिंदे यांनी दिली.

ही लोक अदालत राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या निर्देशानुसार संपूर्ण देशभरात आयोजित करण्यात आली होती. रायगड जिल्ह्यात प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश डॉ. सृष्टी निळकंठ यांच्या मार्गदर्शनाखाली ३१ हजार ९६२ प्रकरणे (१९ हजार २२२ वादपूर्व व १२ हजार ७४० प्रलंबित) लोकन्यायालयात ठेवण्यात आली. त्यामधून १,९४८ वादपूर्व व २,४१३ प्रलंबित प्रकरणे यशस्वीपणे निकालात आली.

जिल्ह्यात २७ लोक अदालतीचे कक्ष एकाचवेळी कार्यरत करण्यात आले. तांत्रिक प्रगतीचा लाभ घेत व्हिडीओ कॉलद्वारेही प्रकरणे निकाली काढण्यात आली, त्यामुळे अनेक पक्षकारांना न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहण्याची गरज भासली नाही.

**मोटार अपघात प्रकरणे:**

१७ मोटार अपघात प्रकरणांत पक्षकारांमध्ये तडजोड साधण्यात आली असून, यामध्ये १ कोटी ५८ लाख ७५ हजार रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली आहे.

**संसारांना नवे वळण:**

या लोक अदालतीच्या माध्यमातून ५ वैवाहिक वाद मिटविण्यात आले. रोहा (१), महाड (२) आणि पनवेल (२) येथील पाच जोडप्यांमध्ये सामंजस्य निर्माण होऊन त्यांच्या संसारांना पुन्हा नवसंजीवनी मिळाली.

या उपक्रमात न्यायिक अधिकारी, वकील वर्ग, जिल्हा परिषद, रायगड पोलीस व सर्व पोलीस कर्मचारी यांचे मोठे सहकार्य लाभले. यशस्वी आयोजनाबद्दल डॉ. सृष्टी निळकंठ आणि न्यायाधीश अमोल शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले आणि या यशाबद्दल समाधान व्यक्त केले.

# गुरूदेव सिद्धपीठ गणेशपुरी येथे सत्संग महोत्सव


● दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : " स्वामी मुक्तानंद परमहंस" यांच्या 117 व्या जयंतीनिमित्त शुक्रवार दिनांक-16 मे 2025 रोजी " गणेशपुरी गुरूदेव सिद्धपीठ" येथे सत्संग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्ताने गुरूदेव सिद्धपीठ गणेशपुरी, ता.भिवंडी,जि.ठाणे. येथे संस्थेकडून सत्संग महोत्सवानिमित्त उपस्थित असणाऱ्या सर्व साधकांना महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे,स्वामी मुक्तानंद यांचे देशविदेशातील असंख्य भक्तगण आपल्या गुरूंच्या जयंतीनिमित्त उपस्थित राहून सत्संगरूपाने आपली साधना करीत असतात.

तरी सदर सत्संग महोत्सवानिमित्त साधकांनी/ भाविकांनी 16 मे 2025 रोजी सायंकाळी-7.00 वाजता साधक भवन,गणेशपुरी येथे उपस्थित राहण्याचे निमंत्रण सिद्धयोगचे उमेश कुक्यान व कल्याणदीपचे रमेश आवारे यांच्याकडून करण्यात आले आहे.


## रेसिपी
# छोले कटलेट



साहित्य-एक कप -भिजवलेले छोले,एक -कांदा,दोन -हिरव्या मिरच्या,एक चमचा -आले पेस्ट, कोथिंबीर, मिरचीचे तुकडे, एक चमचा -चाट मसाला, अर्धा चमचा -मिरे पूड, ब्रेडचे तुकडे
चवीनुसार मीठ

कृती- सर्वात आधी एका भांड्यात भिजवलेले छोले घ्यावे आता त्यात आल्याची पेस्ट, मिरची, ब्रेडचे तुकडे, मीठ, चाट मसाला आणि काळी मिरे पूड घालावी. तसेच आता आता ते मिक्सरमध्ये टाका आणि पेस्ट बनवा. आता चिरलेला कांदा आणि ब्रेडचे छोटे तुकडे घाला. यानंतर त्यात चार चमचे मैदा घाला. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही त्यात बेसन आणि रवा देखील घालू शकता. तसेच तुम्ही त्यात उकडलेले बटाटे, किसलेले चीज किंवा काजू देखील घालू शकता.आता त्यात थोडे तेल घाला आणि पीठ हातात घ्या आणि त्याला कटलेट किंवा टिक्कीचा आकार द्या. यानंतर ते शॅलो फ्राय करा. जास्तीचे तेल शोषून घेण्यासाठी ते टिश्यू पेपरवर ठेवा. आता त्यावर चाट मसाला शिंपडावा. तर चला तयार आहे आपली छोले कटलेट रेसिपी, चटणी सोबत नक्कीच सर्व्ह करा.

# उल्हासनगरमध्ये गौतम बुध्द जयंती साजरी



● दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर(प्रफुल्ल केदारे)
उल्हासनगर - ३ मध्ये भारतीय बौध्द महासभा. शाखा सुभाष नगर, पंचशील बुध्द विहारात जगाला शांततेचा संदेश देणारे तथागत भगवान गौतम बुध्द यांची २५६९ वी जयंती आणि (वैशाख पौर्णिमा) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सामूहिक त्रिसरण पंचशील का हळू करून तथागत गौतम बुद्ध यांच्या उपदिशांवर आणि आयुष्यावर अनेकांनी आपली मत व्यक्त केली.

यावेळी, सुभाष नगर शाखेचे अध्यक्ष अशोक शिरसाठ, भारतीय बौध्द महासभा ठाणे जिल्हा सरचिटणीस छगन सुरवाडे यांनी मार्गदर्शन केले . तसेच या जयंती प्रसंगी परसराम ओंकार, बेबीताई थोरात, रेखाताई ओंकार, अंजनाबाई सपकाळे, माजी अध्यक्ष एफ ए शिरसाट, जी बी ओव्हाळ, यांच्यासह उपासक, उपासिका यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुरुषप्रधान संस्कृतीला एकच सवाल
## लग्नानंतर मुलगी, मुलगी राहत नाही का ? - स्मिता गुलाबराव शेळके

● दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पारनेर : जी एस महानगर सहकारी बँकेचा निवडणुकीचा बिगुल वाजला असतानाच , शुभेच्छा आणि सदस्यांकडून मिळालेल्या पाठिंब्यामुळे मी खूप आनंदी आहे. परंतु , एक चुकीचे कथन माझ्याबद्दल तयार करण्यात आले आहे, ज्यामध्ये लग्नानंतर माझ्या गुजराती घराण्यातील वैवाहिक स्थितीचा चुकीचा संदर्भ घेतला जात आहे. या चुकीच्या प्रचाराला उत्तर देणे गरजेचे वाटते. माझ्या बद्दल चुकीचा प्रचार करून जाणीवपुर्वक सभासदांच्या मनात गैरसमज पसरविण्याचे काम काही व्यक्ती करत असून माझ्याबाबत चुकीचे आणि अनावश्यक मुद्दे उपस्थित करत आहेत , असे स्पष्ट प्रतिपादन जी एस महानगर बँकेचे संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके व अध्यक्षा सुमनताई गुलाबराव शेळके यांच्या कन्या व संचालिका स्मिता गुलाबराव शेळके यांनी केले आहे .

त्या पुढे म्हणाल्या की , मी जी . एस . महानगर को-ऑपरेटिव्ह बँक




**राज्याचे ज्येष्ठ नेते शरदराव पवार यांची कन्या खा. सुप्रिया सुळे , दिवंगत ज्येष्ठ नेते गोपीनाथ मुंडे यांची कन्या ना. पंकजा मुंडे या वडीलांचा व कुटुंबाचा वारसा पुढे चालवू शकतात , मग मी का वारसा चालवू शकत नाही , असे ही स्मिता गुलाबराव शेळके यांनी सांगितले.**

गुजरातला नेणार आहे , असा खोटा आरोप माझ्यावर केला जात आहे , पण मी स्पष्टपणे सांगू इच्छिते की , मी कायदेशीर आणि वैयक्तिकरित्या, नेहमीच स्मिता गुलाबराव शेळके आहे. माझे नाव माझ्या पालकांच्या वारसाचे आणि माझ्या संस्कारांचे प्रतीक आहे, ज्यांनी मला सत्यता आणि सेवा शिकवली आहे. माझे गुजराती घराण्यात लग्न झाले आहे, पण त्याचा अर्थ असा होत नाही की, मी माझ्या मूळ शेळके कुटुंबाचा भाग राहिलेली नाही. एका मुलीचे तिच्या कुटुंबाशी असलेले नाते लग्नामुळे कधीच संपत नाही. माझ्या मूळ घराण्याशी असलेले माझे प्रेम, निष्ठा, आणि मूल्ये कधीही कमी होणार नाहीत. माझ्या विरुद्ध पुर्वदोषी वैयक्तिक भूमिका घेत , जाणीव पुर्वक अशा चुकीच्या प्रचाराचा प्रसार करणाऱ्यांना मी सांगू इच्छिते की , तुम्हांला खरंच वाटते का ? की , मुली लग्नानंतर त्यांच्या मूळ कुटुंबाचा भाग राहात नाहीत ? तुमच्या स्वतःच्या मुलींना तुम्ही हा विचार लागू कराल का ? नाही ना, मग सार्वजनिक जीवनात नेतृत्व करण्याचा निर्णय घेतल्यामुळे माझ्या बाबतीच असा दृष्टिकोन का लादला जातो ? ही बाब फक्त माझ्यापुरती नाही, तर आपल्या समाजातील प्रत्येक कुटुंबातील प्रत्येक मुलीच्या स्थानासाठी आहे. जर आपण असे पुर्वग्रह टिकू दिले, तर आपण समर्पित आणि पात्र महिलांना सार्वजनिक सेवा व सामाजिक जीवनात नेतृत्व करण्यापासून परावृत्त करू .

बँकेसाठी आणि सभासदांच्या हितासाठी माझी बांधिलकी ही आहे की , जी एस महानगर सहकारी बँकेची संचालक म्हणून माझ्या दोन वर्षांच्या कार्यकाळात मी बँकेच्या विकासासाठी आणि सभासद , ठेवीदार , कर्जदार व कर्मचाऱ्यांच्या हितासाठी काम केले आहे. विचारशील , समावेशक आणि समर्पित सेवा हे नेहमीच माझे उद्दिष्ट राहिले आहे. मग का माझ्यावर असे शाब्दिक हल्ले केले जात आहेत?

बँकेच्या सर्वांगीन प्रगतीसाठी मी एक नम्र आवाहन करते की , या फूट पाडणाऱ्या नकारात्मक प्रचाराला नाकारून सत्य समजावून घ्यावे . नेतृत्व, सेवा आणि बँकेच्या सदस्यांच्या हितासाठी समर्पण , समानता, सन्मान, आणि प्रगती यांचे मूल्य जपण्यासाठी आपण एकत्र उभे राहूया. एका न्याय्य आणि आधुनिक समाजात, कोणत्याही मुलीला तिचे कुटुंब किंवा समाजात तिचे स्थान सिद्ध करण्याची आवश्यकता नसावी. स्मिता गुलाबराव शेळके म्हणून माझ्या ओळखीवर मी ठाम आहे, असे ही स्मिता गुलाबराव शेळके म्हणाल्या.

## लहान-मोठ्यांसाठी
# युगा फॅशनचा 'रॅम्प रॉकर शो'

● दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सुप्रसिद्ध मॉडेल व अभिनेत्री युगंधरा हारके यांनी मॉडेलिंग क्षेत्रात आवड असणाऱ्यांना मॉडेलिंग सारख्या मोहक क्षेत्राची ओळख व्हावी, या हेतूने १८ मे या दिवशी प्रीती बँकवेट हॉल, डोंबिवली पश्चिम येथे युगा फॅशनच्या माध्यमातून "रॅम्प रॉकर शो" चे आयोजन केले आहे.

युगंधरा यांनी अमेझॉन, सरस्वती साडी, मॉडेल ऑफ ॲनालिस्ट स्टुडिओ कव्हरपेज या जाहिराती, तसेच मराठी रंगभूमी अशा अनेक माध्यमातून स्वतःला सिद्ध केले आहे.



कल्याण डोंबिवली मधील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयीन मुले व मुली तसेच विवाहित महिला व पुरुष यांना युगा फॅशनच्या माध्यमातून "रॅम्प रॉकर शो" मध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन युगंधरा हारके यांनी केले आहे.

सहभागी होणाऱ्यांना १७ मे रोजी ग्रुमिंग सेशन होणार आहे. रॅम्प रॉकर शो मध्ये सहभागी होणाऱ्यांमधून प्रथम तीन विजेत्यांना क्राऊन, ट्रॉफी व प्रमाणपत्र दिले जाणार असून ग्लॅमरस हेअर आणि मेकअप बद्दल माहिती दिली जाणार आहे. इतर सर्व सहभागी स्पर्धकांना सबटायटल्स - क्राउन, सर्टफीकेट, ट्रॉफी दिली जाणार आहे. अधिक माहितीसाठी ७३०३३०७०८८ या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन युगंधरा हारके यांनी केले आहे.






# टिटवाळ्यातील धोकादायक होर्डिंग भुईसपाट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** – नागरिकांच्या जीविताला, सार्वजनिक मालमत्तेला धोका पोहचवेल अशाप्रकारचे टिटवाळा मांडा पश्चिम भागातील आझादनगर परिसरात सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलेले एक भव्य धोकादायक होर्डिंग पालिकेच्या अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीत शनिवारी बुडासकट कापून भुईसपाट करण्यात आले. टिटवाळा मांडा पश्चिममध्ये आझादनगर येथे कल्याण डोंबिवली पालिकेच्या मालमत्ता विभागाच्या परवानग्या न घेता काही मंडळींनी एकत्रित येऊन एक ३० बाय ४० फूट आकाराचे भव्य होर्डिंग सार्वजनिक रस्त्याच्या, पादचारी मार्गाच्या बाजुला उभारले होते. वादळ, वारा, पाऊस असला की या बेकायदा होर्डिंगवर लावण्यात आलेल्या पत्र्यांचा मोठ्याने आवाज परिसरात



यायचा. वादळ वारा सुरू असेल तर पादचारी, वाहन चालकांना या भागातून जाताना होर्डिंग वाऱ्याच्या वेगाने तुटेल अशी भीती वाटायची. मांडा, टिटवाळा, आझादनगर भागातील अनेक नागरिकांनी या बेकायदा भव्य फलका विषयी पालिकेच्या अ प्रभागात तक्रारी केल्या होत्या.

हा फलक लावणारे इसम आपल्या सोयीच्या जाहिराती या फलकावर लावत होते. अन्य कोणाला या मुख्य वर्दळीच्या फलकावर जाहराती लावायच्या असतील तर त्यांच्याकडून पैसे घेत असल्याच्या तक्रारी पालिकेच्या मालमत्ता विभाग, अ प्रभाग कार्यालयाकडे येत होत्या. घाटकोपर येथील फलक कोसळण्याच्या घटनेनंतर न्यायालय, शासनाने सार्वजनिक ठिकाणी लावण्यात येणाऱ्या फलकांविषयी नियमावली जाहीर केली आहे. या नियमाचे उल्लंघन करून टिटवाळा मांडा येथे हे होर्डिंग लावण्यात आले होते. या बेकायदा फलकाच्या माध्यमातून काही इसम परस्पर व्यवसाय करत असल्याचे आणि पालिकेला एक पैशाचाही लाभ या फलकाच्या माध्यमातून होत नसल्याचे अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांच्या निदर्शनास आले. या फलक लावणाऱ्या इसमांचा शोध घेण्यात आला.

या भव्य फलकामुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. महिनाभरात पावसाळा सुरू होईल. त्यावेळी हा भव्य फलक कोसळला तर जीवित हानी होण्याची शक्यता आहे. असा विचार करून साहाय्यक आयुक्त पाटील यांनी शनिवारी तोडकाम पथक, जेसीबीच्या साहाय्याने आझादनगर येथे जाऊन शनिवारी बेकायदा फलकाचे दोन्ही आधार खांब कटरच्या साहाय्याने कापून टाकले. फलकाला दोर बांधून ते जेसीबीला बांधण्यात आले. जेसीबीच्या साहाय्याने फलकाला ताण देताच काही क्षणात बेकायदा फलक जमीनदोस्त झाला.

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
**जलसंपदा विभाग**
**कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प विभाग, कळवा, ठाणे.**
Email: eehpthn@rediffmail.com फोन नं. (०२२) २५४२६०५३
**(Recall-3) निविदा सुचना क्रमांक १३/२०२४-२५**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता जलविज्ञान प्रकल्प विभाग कळवा, ठाणे, जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन हे सक्षम शासन निविदाकारांकडून खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. निविदा सुचना शासनाच्या http://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता जलविज्ञान प्रकल्प विभाग कळवा, ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

| कामाचे नांव | जिल्हा | निविदेची किंमत रु. |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| Providing and Fixing of FRP Sheets, Establishment of Musto Benchmark at AWLR - River Stations and Provision of Gauge Inspector for Hydrology Project Subdivision Kalwa | ठाणे | ७,८६,७९८/- |

| | | | |
|---|---|---|---|
| निविदा उपलब्ध कालावधी | : | दि. १३/०५/२०२५ ते दि. २०/०५/२०२५ | वेळ ११:०० ते १७:०० वाजता |
| निविदा स्वीकारण्याचा कालावधी | : | दि. २१/०५/२०२५ | वेळ-१७:०० वाजे पर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | : | दि. २२/०५/२०२५ | वेळ -१२:०० वाजता |
| निविदा संच खरेदी किंमत | : | रु. ११८०/- | |

सुचना :-
१) निविदाकर महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंदणीकृत असावा
२) निविदा विकत घेण्यासाठी सोबत विहित अर्ज नोंदणी प्रमाणपत्र असावे. बंधनकारक आहे.
३) निविदे विषयी सविस्तर माहिती निविदा पुस्तीकेत नमूद आहे.

*जावक क्रमांक : जविप्रविक/लेखा-२/६६०/२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
जलविज्ञान प्रकल्प विभाग कळवा, ठाणे. दि.०५/०५/२०२५
*जावक क्रमांक : जिमाका/ठाणे/जाहि/2025-26/15 दि.०८/०५/२०२५

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**जलविज्ञान प्रकल्प विभाग,**
**कळवा, ठाणे.**

# नवी मुंबई विमानतळाच्या कनेक्टिव्हिटीला चालना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** - नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पश्चिम भागाकडील मार्गिका जोडणीसाठी (कनेक्टिव्हीटी) सिडको आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्यातील संयुक्त प्रकल्प असणाऱ्या पश्चिम प्रवेश आंतरबदलाचे काम येत्या जूनपर्यंत पूर्ण होणार आहे. आम्र मार्ग आणि उलवे किनारी मार्गावरून विमानतळाकडे येणारी-जाणारी वाहतूक या प्रकल्पामुळे सुलभ होणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा पहिला टप्पा पुर्ण होण्याच्या मार्गावर असून विमानतळाला उत्तम मार्गिका जोडणी असावी, याकरिता त्या परिसरातील महत्त्वाच्या मार्गांना विमानतळासोबत जोडण्याकरिता जोडणीमार्गांचे नियोजन करण्यात येत आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा बंदर (पोर्ट) कनेक्टिव्हिटी कार्यक्रम हा त्यातील एक महत्त्वाचा भाग आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणांतर्गत आम्र मार्ग, राज्य महामार्ग-५४ आणि राष्ट्रीय महामार्ग-४ बी यांच्या विस्तारिकरणाकरिता 'मुंबई-जेएनपीटी पोर्ट रोड कंपनी लिमिटेड' या विशेष उद्देश वाहन कंपनीची स्थापन करण्यात आली आहे.

या कंपनीच्या माध्यमातून निधी संकलन आणि अंमलबजावणी केली जाणार आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जेएनपीटी आणि सिडको यांची अनुक्रमे ६७.०४%, २६.९१% आणि ६.०५% इतका हिस्सा आहे. सिडकोकडून या प्रकल्पासाठी सुमारे ३ हजार कोटी रुपयांची जमीन देण्यात आली आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकरिता या महामार्गाचे विस्तारीकरण ही महत्त्वपूर्ण मार्गिका जोडणी (कनेक्टिव्हीटी) असणार आहे.

पश्चिम प्रवेश आंतरबदल हा अर्ध क्लोव्हरलिफ रचना असलेला असून, उलवे किनारी मार्गावरील १.२ किलोमीटर उन्नत विमानतळ लिंक रस्त्याशी जोडण्यात आला आहे. या मार्गावर दोन लूप आणि दोन रॅम्प असणार आहेत. दक्षिणेकडे जाण्यासाठी लूप ए आणि उत्तर दिशेसाठी रॅम्प ए, तर विमानतळावरून बाहेर जाण्यासाठी लूप बी आणि रॅम्प बी वापरले जातील. तसेच, एक अतिरिक्त वाहन निम्नमार्ग आणि उलवे नदीवरील छोटा पूलही उभारण्यात येणार आहे.

अटल सेतू ते विमानतळ यामधील जोडणीसाठी उलवे किनारी मार्ग याशिवाय, विमानतळाच्या पूर्व बाजूसही एनएच-४बी (NH-4B), एनएच-५४८ (NH-548) सोबत जोडण्यासाठी पुर्ण क्लोव्हरलिफ प्रकारातील पूर्व प्रवेश आंतरबदल मार्ग प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. अटल सेतू ते विमानतळ यामधील जोडणीसाठी उलवे किनारी मार्ग विकसित केला जात आहे. जून २०२५ च्या पहिल्या आठवड्यात पश्चिम प्रवेश आंतरबदल मार्ग पूर्णतः कार्यान्वित होऊन वाहतुकीसाठी खुला होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# पालघर जिल्ह्यात वन्यप्राण्यांचा मानवी वस्त्यांत वावर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कासा:** पालघर जिल्ह्यामध्ये बुलेट ट्रेन, द्रुतगती महामार्ग, मालवाहतूक रेल्वेसेवा अनेक प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पाच्या कामासाठी मोठ्या प्रमाणामध्ये वृक्षतोड झाली आहे. वृक्षतोड झाल्याने जिल्ह्यातील वन्यप्राण्यांचा निवास असलेले जंगले नष्ट झाल्यामुळे जंगलातील प्राण्यांचा अन्न-पाण्याच्या शोधात मानवी वस्तीत वावर वाढायला सुरवात झाली आहे.

दोन महिन्यापूर्वी डहाणू कोसबाड या भागामध्ये बिबट्या चा वावर पहायला मिळाला होता तसेच पालघर तालुक्यामधील ढेकाळे परिसरात पोल्ट्री फार्म, शेळीपालन या ठिकाणी सुद्धा लांडगा, तरस तसेच बिबट्या यांनी हल्ला केल्याचा घटना घडल्या आहेत. वन्यप्राण्यांनी हल्ला करत कोंबड्या व बकऱ्यांची शिकार करत जीव घेतला होता.

जिल्ह्यात सुरू असलेल्या प्रकल्पामुळे जंगल नष्ट होत असल्यामुळे हिंसक प्राणी अन्नाच्या व पाण्याच्या शोधात नागरी वस्त्यांमध्ये दिसून येत आहेत व हल्ले करत आहेत. महालक्ष्मीगड परिसरातील जंगलात मोठ्या प्रमाणात माकडे राहतात. मागील महिन्यात दोनतीन वेळा या जंगलात आग लागण्याच्या घटना घडल्या त्यामुळे या भागातील माकडे परिसरातील चारोटी, कासा या भागात वावरताना आढळून आले.

# एलईडी पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बोटींवर कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** करंजा बंदर परिसरात मत्स्यव्यवसाय विभागाच्या परवाना अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी छापा टाकत दोन एलईडी मासेमारी बोटींवर कारवाई केली. केंद्र व राज्य सरकारने एलईडी पद्धतीने मासेमारी करण्यास बंदी घातलेली असतानाही या तंत्राचा वापर करीत खोल समुद्रात मासेमारी केली जात आहे.

एलईडी पद्धतीने मासेमारी करीत असतांना लाखोंच्या संख्येने मासे जाळ्यात पकडले जातात. यात माशांचे लहान जीवही पकडण्यात येतात. मात्र यातील जीव हे मृत पावतात त्यामुळे पुढील मासे आणि प्रजनन थांबून माशांची व काही ठराविक जातीच्या माशांची संख्याही कमी होऊ लागली आहे. याच कारणास्तव शासनाने या पद्धतीने मासेमारी करण्यास बंदी घातली आहे.

एलईडी मासेमारी पद्धत खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी गेल्यावर अतिउच्च दाबाच्या वीज दिव्यांचे सेट घेऊन जात आहेत. हे दिवे समुद्रात सोडण्यात येतात. त्यामुळे या प्रकाशावर आकर्षित होऊन लाखोंच्या संख्येने विविध प्रकारचे मासे जाळ्यात येतात. या प्रकारामुळे जलद व मुबलक मासेमारी करून कमी वेळात जास्तीत जास्त नफा कमावला जात आहे.

**करंजा बंदर परिसरात एलईडी मासेमारी करणारे साहित्य असणाऱ्या करंजा आणि पेण तालुक्यातील दादर येथे प्रत्येकी एक अशा दोन बोटींवर कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा मत्स्यव्यवसाय उपायुक्त यांच्याकडे हा प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. यामध्ये बोटींना साडे पाच लाख रुपयांचा दंड आकारण्याची तरतूद आहे. सुरेश बागुलगावे, परवाना अधिकारी, उरण मत्स्यव्यवसाय विभाग**

# पनवेलमध्ये रेशनच्या तांदळाची तस्करी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल :** मुंबई गोवा महामार्गावरील पळस्पे फाटाजवळील ओशियन गेट पार्किंग कंपाऊंडजवळ बुधवारी (७ मे) सायंकाळी साडेचार वाजता सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील १२७९ गोणी तांदळाने भरलेला ट्रक पनवेलच्या पुरवठा अधिकाऱ्यांनी पनवेल शहर पोलिसांच्या मदतीने पकडला. हा तांदळाचा साठा खालापूर येथील जय आनंद फुड इंडस्ट्रीज कंपनीचा असल्याचे पोलिसांच्या आतापर्यंतच्या तपासात उघड झाले आहे. गरीब नागरिकांच्या हक्काचा



तांदूळ परदेशात पाठविण्यासाठी पनवेल येथे आणणार असल्याची माहिती पुरवठा अधिकारी अश्विनी धनवे यांना मिळाली होती. पुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांसह धनवे यांनी सापळा रचला.

पळस्पे येथील ओशियन गेट पार्किंग कंपाऊंड येथे एक ट्रक पोलीस पथकाला सापडला. मात्र तांदळाने भरलेला दुसरा ट्रक तेथून चालकाने पळवला. ट्रकचालक शिवप्रसाद सरोज याच्याकडे पोलिसांनी चौकशी केल्यावर त्याने १२७९ गोणी तांदूळ साठा खालापूर येथील आनंद फूड इंडस्ट्रीजच्या मालकाचा असल्याचे सांगितले.

### तस्करीसाठी पनवेल सुरक्षित ठिकाण?

**जेएनपीटी बंदरमार्गे जल वाहतुकीने देशातील रेशनिंगचा तांदूळ परदेशात पाठविणारी टोळी सक्रिय आहे. पाच वर्षांपूर्वी देखील पनवेल येथील टेक केअर या कंटेनर गोदामात तांदळाचा २२२० गोणी साठा तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली जप्त केला होता. परदेशात तांदळाची तस्करी करून विक्रीसाठी पनवेल हे सुरक्षित ठिकाण मानले जाते.**




# तुंगारेश्वर अभयारण्यात प्राणिगणनेसाठी वनविभागाचे कर्मचारी सज्ज

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसईः** अभयारण्यात असलेल्या प्राण्यांचा आढावा घेण्यासाठी सोमवारी रात्री बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी वनविभागाकडून प्राणीगणना केली जाणार आहे. तुंगारेश्वर अभयारण्यातील पाणवठ्याच्या ठिकाणी माचीवर टेहळणी करून प्राणी गणना करण्यासाठी वनविभाग सज्ज झाला आहे.

वसई पूर्वेच्या भागात मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाला लागूनच तुंगारेश्वर अभयारण्य आहे. हे अभयारण्य आठ हजाराहून अधिक हेक्टर या वनपरिक्षेत्रात हे अभयारण्य विस्तारलेले आहे. या अभयारण्यात विविध पशु प्राण्यांचा वावर आहे. परंतु मागील काही वर्षात अभयारण्यात मानवी हस्तक्षेप वाढला आहे. त्यामुळे अभयारण्यात वर्षभरात वन्यप्राण्यांची संख्या वाढली की कमी झाली, मानवी हस्तक्षेपामुळे प्राण्यांच्या संख्येवर कोणता परिणामा झाला आहे. का? हे जाणून घेण्यासाठी वन विभागातर्फे




**बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी प्राणी गणना केली जाणार आहे. त्यासाठी मचाण व्यवस्था तयार केली आहे. तसेच सहभागी होणारे वन कर्मचारी व प्राणी प्रेमीं यांना सूचना केल्या आहेत**
**- राजश्री साळवे, तुंगारेश्वर वनपरिक्षेत्र अधिकारी.**

दरवर्षी बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी पारंपारिक पद्धतीने प्राण्यांची गणना केली जाते. यंदाच्या वर्षी सुद्धा बुद्ध पौर्णिमेला प्राणी गणना करण्यासाठी वनविभाग सज्ज झाला आहे.

१२ मे सोमवारी सायंकाळी ५ वाजल्यापासून ते १३ मे मंगळवारी पहाटे पर्यंत ही गणना केली जाणार आहे. यात पेल्हार धरण, पारोळ येथील खोकर नाला, तुंगारेश्वर रामकुंड, जूचंद्र पाझरतलाव, चिंचोटी धबधबा, चिंचोटी दहीहंडी, कामण अशा सात पाणवठ्याच्या ठिकाणी नियोजन करण्यात आले आहे. यासाठी लाकडी मचाण (माची) तयार करण्यात आली आहे. त्यावर शांत पणे थांबून टेहळणी केली जाणार आहे. वनकर्मचारी व प्राणीप्रेमी यांच्या मार्फत सोमवारी संध्याकाळपासून ते मंगळवारी सकाळ पर्यंत पाणवठ्याच्या ठिकाणी येणाऱ्या प्राण्यांवर लक्ष ठेवून त्याच्या नोंदी ठेवल्या जाणार आहेत. प्रत्येक ठिकाणी ३ वन कर्मचारी व प्राणी प्रेमीं असणार आहेत यंदा आठ प्राणी प्रेमींनी आतापर्यंत नोंद केली आहे या प्राणीगणनेमुळे अभयारण्यात असणाऱ्या प्राण्याची अंदाजित माहिती यासह एखादा नवीन कोणता प्राणी आला आहे याची माहिती मिळण्यास मदत होणार असल्याचे वनविभागाकडून सांगण्यात आले आहे.

# मिरा भाईंदर मेट्रोच्या कामाला सुरुवात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :-** बहुचर्चित मिरा-भाईंदर मेट्रो मार्गिका ९ च्या चाचपणीला अखेर सुरुवात झाली आहे. रविवारी प्रत्यक्षात मेट्रोचे इंजिन या मार्गावरून चालवून चाचपणी केली. त्यामुळे वर्षा अखेरीस नागरिकांना दहिसर ते काशिगावदरम्यान प्रवासाचा लाभ घेता येणार आहे. मागील पाच वर्षांपासून मिरा-भाईंदर शहरात 'दहिसर-भाईंदर मेट्रो मार्गिका ९' ची उभारणी प्रगतीपथावर सुरू आहे. सध्या या प्रकल्पाचे स्थापत्य काम जवळपास ९० टक्के पूर्ण झाले असून, मेट्रो स्थानक आणि मार्गिकचे काम अंतिम टप्प्यात आहे. या प्रकल्पाचे दोन टप्प्यांमध्ये विभाजन करण्यात आले आहे - टप्पा एकः दहिसर ते काशिगाव आणि टप्पा दोनः काशिगाव ते नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान. या आधारे येत्या



वर्षभरात संपूर्ण मेट्रो मार्ग सुरू करण्याचा एमएमआरडीएचा प्रयत्न आहे.

त्यानुसार, १० मे रोजी पहिल्या टप्प्यासाठी आवश्यक असलेला २५ हजार व्होल्टचा विद्युत प्रवाह जोडण्यात आला आहे.

यामुळे काशिगाव ते दहिसरदरम्यान असलेल्या चार स्थानकांवरील कामाची गती वाढवण्यास मदत होणार आहे. तर ११ मेपासून प्रत्यक्ष मेट्रोचे इंजिन या मार्गावरून चालवून चाचपणीस देखील सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. येत्या वर्षाअखेरीस पहिल्या टप्प्याचा लाभ घेता येणार असल्याचा दावा एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे.

# ठाणे शहरात मोबाईल चोरांचा सुळसुळाट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** घोडबंदर येथील पातलीपाडा भागात रिक्षामध्ये प्रवास करणाऱ्या एका महिलेच्या हातातील महागडा मोबाईल दुचाकीवर आलेल्या चोरट्यांनी खेचून नेल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

नवी मुंबई येथील कामोठे भागात महिला राहते. त्यांचा लग्नसमारंभात मेकअप करण्याचा व्यवसाय आहे. त्यांना वसई येथे बोलाविण्यात आल्याने त्या शनिवारी दुपारी वसई येथे गेल्या होत्या. तेथील काम आटोपल्यानंतर त्या बसगाडीने घोडबंदर येथील पातलीपाडा पर्यंत बसगाडीने आल्या. रात्री ११ वाजता त्या पातलीपाडा बस थांबा येथे उतरल्यानंतर त्यांनी रिक्षातून नवी मुंबई येथे प्रवास करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी रिक्षाने प्रवास सुरु केला. रिक्षाच्या डाव्या बाजूच्या दिशेने त्या बसल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या हातामध्ये ६० हजार रुपये किमतीचा मोबाईल होता. त्या रिक्षाने हिरानंदानी पार्क येथे आल्या असता, एका दुचाकीवर दोन चोरटे आले. त्यांनी तिच्या हातातील मोबाईल खेचला आणि तेथून निघून गेले. यानंतर महिलेने याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल झाला आहे.

ठाणे शहरात मोबाईल हातातून खेचून नेण्याचे अनेक प्रकार समोर आले आहे. मुख्य महामार्ग, मार्गावरून रिक्षाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना हेरून हे चोरटे प्रवाशांचा मोबाईल चोरतात. यापूर्वी पूर्व द्रुतगती महामार्गावर अशा घटना घडल्या आहेत. त्यानंतर आता घोडबंदर मार्गावर हा प्रकार घडल्याने चोरट्यांवर वचक केव्हा बसणार असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

# पोलिसांतील साहित्यिक अर्जुन डोमाडे यांना कुंडल कृष्णाई पुरस्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सातारा येथील कुंडल कृष्णाई या "आम्ही पुस्तकांचे देणं लागतो" हे ब्रीद वाक्य घेऊन साहित्य विषयक कार्य करणाऱ्या संस्थेचे सन २०२५ चे कथा, कविता बाल साहित्य, प्रवास वर्णन इत्यादी साहित्य विभागाचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाले. त्यामधील कथा विभागातील कुंडल कृष्णाई हा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय उत्कृष्ट वाड :मय पुरस्कार पोलिसातील कवी, कथाकार अर्जुन डोमाडे यांच्या डिंपल पब्लिकेशन प्रकाशित "भितुर" या कथासंग्रहाला जाहीर झाला.

नुकत्याच सातारा येथे संपन्न झालेल्या कुंडल कृष्णाई प्रतिठानच्या पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध साहित्यिक कादंबरीकार शरद तांदळे यांच्या हस्ते प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष हनुमंतराव जगदाळे व सचिव सावित्री जगदाळे यांच्या उपस्थित हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. अर्जुन डोमाडे यांनी त्यांच्या पहिल्याच कथा संग्रहाला



मिळालेला हा पहिलाच पुरस्कार "ज्याचे श्रेय त्याला द्यावे" या भावनेतून त्यांच्या मनात साहित्याचे बीज पेरणारे गुरुवर्य कै. अरुण मैड व या कथासंग्रहातील कथांचे कथाबीज पुरविणारे कथेचे ज्ञात ,अज्ञात नायक व नायिका यांना अर्पण केला आहे. पुरस्कार मिळाल्या बद्दल अर्जुन डोमाडे यांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

# केडीएमसीच्या चिखले बाग प्रभागात विकासकामांची भूमीपूजने



● दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक ३० चिखले बाग - मल्हार नगर येथील विविध विकासकामांचा भूमीपूजन सोहळा रविवारी संपन्न झाला. कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर यांच्या आमदार निधीतून, स्थानिक लोकप्रतिनिधी श्रेयस समेळ यांच्या प्रयत्नातून शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख अरविंद मोरे आणि युवासेना जिल्हा चिटणीस वैभव भोईर यांच्या हस्ते हा भूमिपूजन सोहळा संपन्न झाला.

आमदार विश्वनाथ भोईर यांच्या निधीतून प्रभाग क्रमांक ३० चिखले बाग मल्हार नगर येथे गणेश नगर चाळ क्रमांक ६ आणि ७ मधील भुयारी गटार तयार करणे आणि मल्हार नगर येथे पायवाटा तसेच गटार तयार करणे ही विकासकामे केली जाणार आहेत.

या विकास कामांबद्दल स्थानिक नागरिकांनी आमदार विश्वनाथ भोईर यांचे मनापासून आभार मानले आहेत. याप्रसंगी शाखाप्रमुख संतोष घोलप, अचिव्हार्स कॉलेजचे महेश भिवंडीकर, उपविभाग प्रमुख बंटी कुलकर्णी, उपशाखा प्रमुख हितेश भंडारी, प्रदीप वेदपाठक यांच्या सह शिवसेना पदाधिकारी, शिव सैनिक, युवा सैनिक व परिसरा तील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पार्किंगमधील वाहनांचे अज्ञातांकडून नुकसान

## संबंधीत वाहनधारकांवर कार्यवाही करावी अशी रहिवाशांची मागणी | सीसीटिव्हीत दुचाकीस्वार कैद

● दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


डोंबिवली : डोंबिवली एमआयडीसी निवासी, मिलापनगर मधील सर्व्हिस रस्त्यावर गटाराच्या कामामुळे तेथील रहिवाशांना आपली वाहने घरासमोर रस्त्यावर उभी करून ठेवावी लागत आहेत. या अरुंद रस्त्यावर प्रचंड वर्दळ असते, कारण कल्याण शिळ रस्त्यावर होत असलेल्या मेट्रोच्या कामामुळे ट्रॅफिक झाल्याने काही वाहनधारक या सर्व्हिस रस्त्याने वाहतुक वळवतात.

गेले काही दिवस येथील पार्क केलेल्या वाहनांना अरुंद रस्त्यामुळे अज्ञात वाहनांकडून ठोकर मारली जात असल्याने आतापर्यंत अनेक वाहनधारकांचे



नुकसान होत आहे. याबाबत येथील रहिवासी वैभव पोद्दार यानी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसानी या रस्त्यावरील लावलेले सीसी कॅमेरे तपासून संबंधीत वाहनधारकांवर कार्यवाही करावी अशी मागणी येथील रहिवाशांकडून होत आहे. पोलिसानी सीसी कॅमेरे तपासले असता दिनांक 5 मे 2025 रोजी पहाटे तीन वाजता एक दुचाकीस्वार कारला धडकून जखमी झाल्याचे पाहण्यास मिळाले आहे.

एमआयडीसी ठेकेदार कडून होत असलेले नवीन गटारांचे काम हे पुष्कळ दिवसापासुन रेंगाळलेले असून ते लवकरात लवकर पूर्ण केल्यास आणि या रस्त्यावरून बस/ट्रक अशा वाहनांना वाहतुकीसाठी बंद केल्यास सदर प्रश्न सुटू शकतो. शिवाय यामुळे या रस्त्यावर भविष्यात होणारे अपघात होणार नाहीत अशी प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते राजू नलावडे यांनी दिली.




# अंबरनाथमध्ये 'माय मदर सन्मान २०२५'

● दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : मातृत्वाच्या निस्सीम प्रेम, त्याग आणि अथक परिश्रमांचा सन्मान करणारा एक भावनात्मक सोहळा अंबरनाथ पुर्वे च्या रोटरी क्लब सभागृहात पार पडला.२०२५ वर्षाच्या अनुषंगाने समाजातील राजकारण, समाज कारण, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, क्षेत्रातील गुणवंत नेतृत्वांच्या २५ मातांचा सन्मान करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार शत्रूघ्न उमप यांच्या पुढाकाराने हा सोहळा आयोजित करण्यात आला होत. औचित्य होतं. ११ मे रोजी मदर्स डेचं.

यात सन्मानप्राप्त मातांमध्ये न्यायाधीश, पायलट, कुस्तीपटू, डॉक्टर, चार्टर्ड अकाउंटंट, पोलीस अधिकारी, समाजसेवक, उद्योजक, शिक्षण संस्था चालक व विविध क्षेत्रातील यशस्वी व्यक्तींचा समावेश होता. या सन्मानामुळे समाजात मातृत्वा बद्दल कृतज्ञता अधिक दृढ झाली. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. वृषाली विनायक यांच्या प्रेरणादायी व्याख्यानाने झाली. पुरोगामी



महापुरुषांच्या मातांच्या अनुषंगाने सद्यस्थितीतील माता केंद्रस्थानी ठेवून वृषाली विनायक यांनी केलेल्या व्याख्यानाने याक्षणी महिलांचे डोळे पाणावले.

वृषाली विनायक यांनी मातृत्वाचे सामाजिक, भावनिक आणि मानसिक आयाम मांडत उपस्थितांचे अंत:करण भारावून टाकले. त्यानंतर प्रा. प्रफुल्ल केदारे ,भरत अंबवणे आणि अनुपमा शर्मा यांनी आईंच्या महतीवर आधारित हृदयस्पर्शी गीतांची सुरेल मैफल सादर करून वातावरण अधिक भावनात्मक केले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे माजी नगरसेवक सुभाष साळुंके, संवाद फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ. सुवर्णा साळुंके, डॉ.पल्लवी गायकवाड, अखिल भारतीय मानवाधिकार संघटनेचे गवर्नर अजयश्रीनिवास चिरीवेला, सुंदरलाल डांगे, प्रल्हाद कसबेकर, विजय हनवते, पत्रकार अरुण ठोंबरे , पत्रकार जेष्ठ सिजर लॅरिन्स, कमर काझी, राजू सूर्यवंशी, प्रफुल थोरात, गणेश गायकवाड, उस्मान शहा पांडुरंग रानाडे, वामन उगले, अशोक नाईक, परेश भानुशाली, हरि अल्हाट, मुद्दसरअली आदी मान्यवर उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार ,बाबू आढाव, फाल्गुनी गायकवाड, गणेश घरत, ,विजय साठे, प्रवीण गायकवाड आदींनी परिश्रम घेतले.



मातृदिनानिमित्त श्री सिद्धिविनायक अन्नछत्र मंडळाच्या वतीने येणाऱ्या सर्व गणेश भक्तांना अन्नदानाचा आयोजन करण्यात आलेला आहे तसेच श्री सिद्धिविनायक अन्नछत्र मंडळाच्या वतीने दररोज प्रसादाचा आयोजन करण्यात येत असतं.



१० मे २०२५ रोजी पनवेल येथील के. गो. लिमये वाचनालयात अनेक मान्यवरांच्या आणि ४०+ साहित्य रसिकांच्या उपस्थितीत श्रीम. सुनीता जोशी ह्यांच्या माझ्या जलमाची गोष्ट ह्या पुस्तकाचे प्रकाशन माझ्या हस्ते झाले. ह्या वेळचे माझे ४५ मिनिटांचे भाषण श्रोत्यांना खूपच आवडले. ह्या पुस्तकाला मी प्रस्तावना लिहिली आहे. पुस्तकाचा विषय महत्वाचा, ओघवत्या, प्रांजळ भाषा शैलीत मांडलेला आहे. छपाई सुंदर आहे. एकंदरीतच पुस्तक वाचनीय, संग्राह्य आहे.सुनीताबाईंचे अभिनंदन आणि आभार. पुढील साहित्यिक प्रवासासाठी हार्दिक शुभेच्छा.

# उष्णतेचा तडाखा : लग्नसराईचा धुमधडाका!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

● मुरबाड(बाळासाहेब भालेराव) : मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भाग तसेच मुरबाड शहर परिसरात मोठा प्रमाणात उष्णतेचा तडाखा असला तरीही शहरी व ग्रामीण भागात लग्नसराईचा धुमधडाका पाहायला मिळत आहे. तर मुरबाड तालुक्यातील कोरावळे येथील भास्कर नारायण धुमाळ यांनी आपल्या कन्येचा लग्नाचा विधी एकच दिवसात अर्थात उटणे, हळदी, आणि लग्न समारंभ एकाच दिवशी पार पडला आहे. एक दिवशी लग्न समारंभात खर्चाची मोठी बचत होते त्यामुळेच भास्कर धुमाळ यांनी एक दिवशी लग्नाला पसंती दिली त्यामुळे भास्कर धुमाळ यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

मुरबाड तालुक्यातील सरळगाव , म्हसा , शिवळे ,टोकाकडे, धसई, शिवळे या विभागातील तसेच परिसरातील जवळपास मार्च एप्रिल,मे २०२५ या महिन्या दरम्यान जवळपास २१७ लग्नाचा बार उडला



आहे याचा अर्थ असा की २१७ जोडपी विवाहबद्ध झाल्याची माहिती मुरबाड तालुक्यात प्रसिद्ध भटजी मोहन (तात्या) रत्नाकर यांनी दिली आहे. या सर्व लग्न समारंभात सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी वधू- वरास मोठ्या प्रमाणात शुभेच्छा देताना चित्र दिसून आले आहे.

> **लग्न समारंभात वधू वर मंडळीच्या पाहुण्यांनी काळजीपूर्वक फोर व्हीलर वाहने / टू व्हीलर सावकाश चालवावी.शक्यतो लग्न समारंभ जाण्यासाठी मोटरसायकल स्वराने हेल्मेटचा वापर करावा.मागील वर्षापेक्षा यावर्षी लग्न कमी प्रमाणात लागताना दिसत आहे.**
> **- मोहन (तात्या) रत्नाकर,प्रसिद्ध भटजी, संगम गाव/मुरबाड**

मात्र गेल्या आठवड्यापासून हळदी व लग्न समारंभावर पावसाचे सावट असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यातच पूर्वी लग्न सकाळी किंवा दुपारी लागायची परंतु आता कडक उन्हाळयाचा अंदाज बघून सर्वत्र लग्नही संध्याकाळच्या सुमारास लागतात त्यातच संध्याकाळी पाऊस आल्याने लग्न सोहळयात मोठी तारांबल उडाल्याचे चित्र दिसून येत आहे.

३१मे पर्यंत लग्नाचा मुहूर्त असल्याने त्यासाठी वाजंत्री, कॅटर्स, स्वयंपाकी, यांना जरी सुगीचे दिवस येणार असल्याने तरी तेही वेळेवर मिळेना अशी परिस्थिती होणार आहे. कारण यांची लग्न जमले आहेत त्यांनी एक ते दीड महिन्यांपूर्वी ऑर्डर्स बुकिंग केले आहेत

मुरबाड सारख्या ग्रामीण भागातील सरळगाव, टोकावडे, म्हसा धसई, शिवळे तसेच मुरबाड शहर या प्रमुख बाजारपेठेमध्ये लग्नसरासाठी किराणा दुकान, कपड्याचा दुकान तसेच ज्वेलर्स मध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल झाल्याचे माहिती व्यापारी वर्गांनी दिली आहे. मंडप डेकोरेशन व वाजंत्री साठी ऍडव्हान्स देणे सुरू झाले.तर महागाईची मोठी झळ सध्या वधू- वर पालकांना सहन करावी लागत आहे सर्व ठिकाणी महागाई वाढल्याने त्यात सोन्याचा भाव लाखाच्या आसपास गेल्याने लग्न समारंभासाठी वधू- वर मंडलीची मोठी कसरत करावी लागत आहे.

# डोंबिवलीत नाका कामगारांना सुरक्षा व अत्यावश्यक संच वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

● डोंबिवली : शहरातील महाराष्ट्र जनरल कामगार संघटना नाका कामगारांना शासकीय योजना माध्यमातून लाभ मिळण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असते. कामगारांची सुरक्षितता आणि इतर योजनांची माहिती वेळोवेळी देवून त्यांच्यामध्ये जागरूकता आणत असते. गरजवंत कामगारांसाठी व लाभार्थ्यांसाठी ही मोठी गोष्ट आहे असे वक्तव्य शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे डोंबिवलीत केले.

महाराष्ट्र जनरल कामगार संघटना माध्यमातून डोंबिवलीत नाका कामगारांना सुरक्षा व अत्यावश्यक संच वाटप उपक्रम पूर्वेकडील गांधीनगर येथील स्व. आनंद दिघे सभागृहात आयोजित करण्यात आला होता त्यावेळी



लांडगे बोलत होते. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, तालुकाप्रमुख महेश पाटील, उद्योजक विकी हिंगे, शाखाप्रमुख संजय मांजरेकर, यादव ऑटोबाईलचे संभाजी यादव, काँगेसचे गणेश चौधरी, सिनेअभिनेत्री अक्षता दास, कामगार नेते संजय ठोंबरे, दिपेश दोशी, मंगेश मोरे, संदीप गव्हाणे, नगरसेवक पंढरीनाथ पाटील, संजय पावशे, डॉ. रमेश सुवर्णा, रेखा कांबळे, संजय पौळकर, आनंद नवसागरे आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान लांडगे म्हणाले, संघटनेच्या माध्यमातून संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण मिसाळ यांचे काम लक्षवेधी आहे. महाराष्ट्र इमारत व बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ माध्यमातून मिळणाऱ्या प्रत्येक योजनांवर मिसाळ लक्ष ठेवून असतात. कामगारांची सुरक्षितता, त्यांच्या मुलींसाठी विवाह निधी, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती अशा ज्या काही योजना आहेत त्या पूर्णपणे मिळवून देण्यासाठी धडपड असते असेही लांडगे यांनी सांगितले. तर संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण मिसाळ यांनी सांगितले की, नाका कामगारांसाठी सरकारच्या माध्यमातून अनेक योजना राबविल्या जातात. त्या योजनांतून दरवर्षी कामगारांना सेफ्टी किट, कामगारांच्या मुलांना शैक्षणिक शिष्यवृत्ती, त्यांच्या मुलींच्या लग्नासाठी ५१ हजार रुपये, जर मुले इंजीअरिंगमध्ये शिक्षण घेत असतील तर त्यांच्यासाठी ६० हजार रुपये, वैद्यकीय शिक्षणासाठी एक लाख रुपये, कामगाराच्या काम करताना अपघात झाला तर त्यासाठी पाच लाख रुपये, तसेच ७५ टक्के अपंगत्व आले तर त्यासाठी दोन लाख रुपये अशा विविध सरकारी योजनांचा लाभ नाका कामगारांना मिळवून देण्यासाठी सांगताना सर्वपरी प्रयत्न करीत असते.

सदर संच वाटप कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण मिसाळ, सचिव नामदेव भानुसे, खजिनदार रामचंद्र वाघ, पदाधिकारी गजानन डांगे, कमलाकर पाटील, चंद्रकांत गायकवाड, वंदना जाधव, रामेश्वर शेजुळ, समाधान धास, दीपक वाघ यांनी विशेष मेहनत घेतली.

# दुर्मिळ अस्थिसंसर्गाचे अखेर झाले निदान

## कल्याणच्या फोर्टिस हॉस्पिटलमधील मल्टि-स्पेशलिटी टीमच्या मदतीने हाडांच्या एका दुमिळ संसर्गातून बरे होण्याचा मार्ग

● दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : थॅलेसेमिया मेजरची रुग्ण असलेली १८ वर्षीय रचना शाह (नाव बदलले आहे) हिच्या डाव्या पायावर २०२० साली सांध्यांची शस्त्रक्रिया करण्यात आली होती, ज्यामुळे तिचा पाय कायमचा आखूड झाला होता व त्यामुळे तिला लंगडत चालावे लागत होते. काही काळाने रचना हिला भरपूर ताप येऊ लागला व श्वास पुरेनासा होऊ लागला. दोनदा तोल जाऊन पडल्याने तिचे दोनही पाय व बाहू फ्रॅक्चर झाले व तिला आपल्या डाव्या पायावर उभे राहणे अशक्य झाले.

या घटनांनी धास्तावलेल्या व त्यामागचे कारण शोधून काढण्यासाठी धावाधाव करणाऱ्या तिच्या पालकांनी पुढील पाच वर्षे तिला एका हॉस्पिटलमधून दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये असे अनेक ठिकाणी नेले व अनेक डॉक्टरांचा सल्ला घेतला. प्रत्येक वेळी डॉक्टरांना भेटल्यावर त्यांचा गोंधळ अधिकच वाढत होता, तपासणीत नवनव्या चाचण्यांची भर पडत होती आणि आजाराची कोणतीच सुस्पष्ट कल्पना न आल्याने या कुटुंबाची मन:स्थिती असहाय बनली होती. मात्र सगळी आशा संपून गेली आहे असे वाटत असतानाच त्यांना फोर्टीस हॉस्पिटल, कल्याणला भेट देण्याचा सल्ला मिळाला व त्यांच्यासाठी तो एक कलाटणीचा क्षण ठरला , जणू काही त्यांची प्रार्थना ऐकली गेली.

फोर्टिस हॉस्पिटल कल्याण मधील डॉ. स्वप्नील केणी – कन्सल्टन्ट ऑर्थोपेडिक आणि डॉ. हमझा दलाल, कन्सल्टन्ट- हीमॅटोलॉजी व यांच्या नेतृत्वाखालील तज्ज्ञांच्या टीमने रचना हिला बरखोल्डेरिया स्युडोमॅली (Burkholderia Pseudomallei) या रोगकारक जंतूमुळे होणारा ऑस्टिओमायलिटिस हा हाडांचा एक दुर्मिळ संसर्ग झाल्याचे निदान केले.

आपल्या मुलींच्या आयुष्यातील सर्वात कष्टप्रद काळाची आठवण सांगताना सुनिता शाह (नाव बदलले आहे) म्हणाल्या, "तिच्या सांध्यांच्या शस्त्रक्रियेमध्ये तिचा पाय आखूड झाल्याने ती लंगडत चालायची, यामुळे तिच्या हालचालींवर परिणाम झाला. तसेच काही आठवड्यांनंतर ती पूर्णपणे अंथरुणाला खिळली होती, तापाने फणफणली होती व आपल्याला वेदना होत असल्याची तक्रार करत होती. या समस्येवरील उत्तरासाठी दारोदारी फिरल्यानंतरही तिच्या आजाराचे मूळ कारण काय आहे याविषयी डॉक्टर अनभिज्ञच होते. सुरुवातीला आम्हाला वाटले की रचनाला थॅलेसेमिया असल्याने तिला या सगळया त्रासातून जावे लागत आहे, ज्याचे निदान ती महिनाभराची असतानाच झालेले होते. पण थॅलेसेमिया हे तिच्या आजाराचे कारण नव्हते आणि फोर्टिस हॉस्पिटल येथील डॉक्टरांनी जेव्हा आम्हाला निदान सांगितले व आमच्या मुलीसाठी उपचारांची योजना आखून तिचा त्रास थांबवला तेव्हा कुठे आम्ही सुटकेचा नि:श्वास सोडला."

> **'आता तिची वेदनांपासून सुटका झाली आहे व आपली वैयक्तिक कामे ती पूर्वीप्रमाणे करणे तिला जमू लागले आहे. त्याच जागेवर किंवा शरीरात इतरत्र कुठेही पुन्हा संसर्ग होण्याची शक्यता असल्याने तिला तज्ज्ञांच्या मदतीने नियमितपणे देखरेख ठेवावी लागेल.' - डॉ. केणी**

उपचारांच्या आखणीविषयी फोर्टिस हॉस्पिटल, कल्याण येथील ऑर्थोपेडिक विभागाचे कन्सल्टन्ट डॉ. स्वप्नील केणी म्हणाले, "ऑस्टिओमायलिटिसचे निदान झाले की, जंतूसंसर्ग समूळ नष्ट करण्यासाठी सर्जिकल डीब्रीजमेंट करणे तसेच प्रदीर्घ काळासाठी IV अँटिबायोटिक्स देणे आवश्यक असते. आम्ही रुग्णाच्या मांडीच्या हाडामध्ये व त्याभोवतीच्या स्नायूंमध्ये जमलेला पू काढून टाकला, आणि संसर्गाचे प्रमाण खूप जास्त असल्याने तसेच थॅलेसेमियामुळे रुग्णाची रोगप्रतिकारशक्ती खूपच दुर्बल असल्याने हे काम विशेषत्वाने आव्हानात्मक होते. या स्थितीला कारणीभूत ठरलेल्या जीवसंस्थेची ओळख पटण्यासाठी सखोल मायक्रोबायोलॉजिकल चाचण्या करण्यात आल्या व उचित, संवेदनक्षम अँटिबायोटिक्स सुरू करण्यात आल्या. त्याचवेळी हिमोग्लोबिनची योग्य पातळी जपण्यासाठी ऑपरेशनच्या आधी व नंतर रुग्णाला रक्त चढविणे अत्यावश्यक होते. डॉ. दलाल यांच्या मदतीने रुग्णाची आधीपासूनची स्थिती हाताळली गेली."

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित

**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024